आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५वाजता
८ मार्च २०२५ शनिवार

**ठळक बातम्या**

- देशातल्या कार्यबलात महिलांचा सहभाग वेगानं वाढण्याची गरज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडून व्यक्त

- महिलांचा सन्मान ही समाज आणि देशाच्या विकासाची पहिली पायरी असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- युक्रेनमध्ये रशियानं केलेल्या हल्ल्यांमध्ये १४ जण ठार

**आणि**

- आशियाई कबड्डी अजिंक्यपद स्पर्धा भारतीय महिला संघ पाचव्यांदा विजयी

**<><><><><>**

भारत जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेनं वाटचाल करत असताना देशातल्या कार्यबलात महिलांचा सहभाग वेगानं वाढला पाहिजे, असं मत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केलं आहे. 'नारी शक्ती से विकसित भारत' या विषयावरच्या राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन आज राष्ट्रपतींच्या हस्ते नवी दिल्लीत झालं, त्यावेळी त्या बोलत होत्या. विकसित भारताची उभारणी केवळ स्वावलंबी, स्वाभिमानी, स्वतंत्र आणि सक्षम महिलांच्या बळावरच होऊ शकते, असं त्या म्हणाल्या. विकसित भारताचं स्वप्न साकारण्यात देशातल्या मुली महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं त्यांनी सांगितलं. महिलांबद्दल आदराची भावना बाळगली तरच भयमुक्त सामाजिक वातावरण निर्माण होऊ शकतं. अशा वातावरणातून मुलींना मिळणारा आत्मविश्वास आपल्या देशाला नव्या उंचीवर नेईल, असं त्या म्हणाल्या.

**होल्ड बाईट.... राष्ट्रपती**

**<><><><><>**

विकसित भारताचं स्वप्न पूर्ण करण्यात नारी शक्तीची सर्वात मोठी भूमिका असणार आहे. महिलांचा सन्मान ही समाज आणि देशाच्या विकासाची पहिली पायरी आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. नवसारीतल्या वंसी-बोरसी इथं लखपती दीदी संमेलनाला संबोधित करताना ते बोलत होते. या कार्यक्रमासाठी एक लाख महिला उपस्थित होत्या. लिज्जत पापड, अमूलसारख्या उद्योगातील महिलांच्या सहभागाचं त्यांनी कौतुक केलं. या कार्यक्रमादरम्यान प्रधानमंत्र्यांनी २५ हजारांहून अधिक स्व-सहाय्यता गटांना ४५० कोटी रुपयांच्या आर्थिक मदतीचं वाटप केलं. जी-सफल आणि जी-मैत्री या दोन योजनांचा शुभारंभही त्यांनी यावेळी केला.

<><><><><>

जागतिक स्तरावर बदल घडत असताना बँकिंग क्षेत्रानं सृजनशीलतेचा ध्यास घेत नेतृत्वगुण अंगिकारले पाहिजेत असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज मुंबईत भारतीय स्टेट बँकेच्या स्थापना दिनाच्या अमृत महोत्सवी सोहळ्यात बोलत होत्या. बँकिंग व्यवसायावर कठोर नियंत्रण असलं तरी स्टेट बँकेनं आपली आघाडी कायम राखण्यात यश मिळवल्याचं त्या म्हणाल्या. सेवेबाबत ग्राहकांच्या अपेक्षांची पूर्तता करताना बँकेनं व्यक्तिगत वितरण व्यवस्थेत परिवर्तन घडवल्याचं सीतारामन यांनी सांगितलं.

<><><><><>

बचतगटांच्या माध्यमातून महिला उद्यमशील बनत असून ग्रामीण भागातली अर्थव्यवस्था अधिक बळकट होत आहे, असं राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. जागतिक महिला दिनानिमित्त 'बेटी बचाओ बेटी पढाओ' कार्यक्रमाचा राज्यस्तरीय दशकपूर्ती समारंभ आणि कन्यारत्न सन्मान कार्यक्रम आज राजभवन इथं झाला, त्यावेळी ते बोलत होते. महिलांच्या योगदानाशिवाय देशाचा विकास होणं शक्य नाही. वर्ष २०२९ पर्यंत राजकीय क्षेत्रात मिळणाऱ्या आरक्षणामुळे महाराष्ट्र हे 'महिला राज्य' होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. छत्रपती शिवाजी महाराजांचं छायाचित्र असलेल्या 'रूपे कार्ड'चं अनावरण यावेळी करण्यात आलं. हे कार्ड, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थ्यांना देण्यात येणार आहे. राज्याच्या पहिल्या महिला मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्यासह विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या महिलांचा सत्कार

यावेळी करण्यात आला. महिला आणि बालविकास विभाग मंत्री आदिती तटकरे या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.

<><><><><>

कौटूंबिक हिंसाचार थांबवण्यासाठी देशातलं पहिलं विवाह पूर्व समुपदेशन आणि संवाद केंद्र आज नाशिक मध्ये सुरू झालं. नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी या केंद्राचं उद्घाटन केलं. केंद्रीय महिला आयाेगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी काही दिवसांपूर्वी याची घोषणा केली होती. या केंद्रात येणाऱ्या जोडप्यांना त्यांचं आरोग्य, कुटुंब नियोजन, न्यायिक अधिकार, विवाहानंतरचे आर्थिक नियोजन याबाबत मार्गदर्शन केलं जाणार आहे.

<><><><><>

दिल्ली सरकारनं आज महिला समृद्धी योजनेला संमती दिल्याची घोषणा दिल्लीच्या मुख्यमंत्री ऱेखा गुप्ता यांनी केली. या योजनेअंतर्गत महिलांना दरमहा अडीच हजार रुपये देण्यात येणार आहेत. या योजनेसाठी पाच हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे तसंच याकरता नोंदणी प्रक्रिया लवकरच सुरु केली जाईल, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मंगळवार पासून दोन दिवसांच्या मॉरिशस दौऱ्यासाठी रवाना होणार आहेत. त्यांच्या राष्ट्रीय दिनाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ते उपस्थित राहणार आहेत. परराष्ट्र मंत्री विक्रम मिसरी यांनी ही माहिती दिली आहे. भारत आणि मॉरिशसमधले संबंध अनेक वर्षांपासून असून ते सामायिक इतिहास, संस्कृती आणि जनतेच्या परस्पर बंधनामुळे आणखी दृढ झाल्याचं त्यांनी म्हटलं आहे. हिंद महासागर आणि शेजारच्या सागरी भागात मॉरिशस भारताचा महत्वाचा भागीदार असल्याचं त्यांनी सांगितलं. या भेटींदरम्यान भारत आणि मॉरिशस या दोन्ही देशांमध्ये अनेक सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या होण्याची शक्यता आहे.

<><><><><>

भारतानं नेहमीच आपल्या शेजारी देशांशी सौहार्दाचे संबंध ठेवले आहेत आणि बांगलादेश यास अपवाद नाही, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. एका वृत्तसंस्थेला

दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. 'मित्र बदलता येऊ शकतील, पण शेजारी नाही' या माजी प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयींच्या विधानाची त्यांनी यावेळी आठवण करून दिली.

<><><><><>

जपानची राजधानी टोकियोमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण आज अयोध्येतल्या श्रीराम मंदिर ट्रस्टचे स्वामी गोविंद देवगिरी महाराज यांच्या हस्ते झालं. भारतात हा पुतळा बनवण्यात आला आहे. आम्ही पुणेकर, इगोदावा इंडिया कल्चरल सेंटर आणि ऑल जपान असोसिएशन यांनी हा पुतळा उभारला आहे.

<><><><><>

युक्रेनमधील डोनेस्क आणि खारकीवसह अनेक भागांत रात्रभर सुरू असलेल्या रशियाच्या हल्ल्यांमध्ये १४ जण ठार ठाले. युक्रेनच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं की रशियाने बॅलेस्टिक क्षेपणास्त्रं, अनेक रॉकेट आणि ड्रोनच्या सहाय्यानं डोब्रोपिलिआवर हल्ला केला. यात आठ मजली इमारती आणि ३० वाहनांचं नुकसान झालं.

दुसरीकडे, युक्रेनला माहिती देणं थांबवण्याच्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयानंतर अमेरिकेची अंतराळ कंपनी मॅक्सार टेक्नॉलॉजीज् ने युक्रेनला उपग्रह छायाचित्रं पाठवणं बंद केलं आहे.

<><><><><>

इक्वेडोरच्या गुयाकील शहरात अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या दोन टोळ्यात झालेल्या गोळीबारात २२ जणांचा मृत्यू झाला आहे. तर तीन जण जखमी झाले आहेत. लॉस टिगुरन्स टोळीतल्या सदस्यांमधे वाद झाल्यामुळे हा गोळीबार झाल्याचं पोलिसांनी सांगितलं.

<><><><><>

जागतिक महिला दिनानिमित्त इटली सरकारनं आज एका विधेयकाच्या मसुद्याला मंजुरी दिली. या विधेयकानुसार देशात पहिल्यांदाच स्त्रीहत्येची कायदेशीर व्याख्या करत, या गुन्ह्यासाठी जन्मठेपेची शिक्षा दिली जाणार आहे. इटलीतील महिलांवरील वाढता हिंसाचार रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याच्या दृष्टीनं हा कायदा केला जाणार आहे. दरम्यान, आज महिला दिनानिमित्त तुर्कीए शहरात हजारो महिलांनी रस्त्यावर उतरून महिलांवरील हिंसाचाराचा निषेध केला.

<><><><><>

सिरियातल्या किनारी भागात लष्कर आणि बंडखोर यांच्यात सुरू असलेल्या लढाईत मरण पावलेल्यांची संख्या पाचशेवर पोहोचली आहे. यात १२० बंडखोर तसंच ९३ लष्करी जवान मरण पावल्याचं  ब्रिटनमधल्या सिरियन ऑब्जर्वेटरी फॉर ह्युमन राइट्स या संस्थेनं म्हटलं आहे. बशर अल असद यांच्या सशस्त्र समर्थकांनी सरकारविरोधात बंडखोरी केल्यामुळे ही लढाई सुरू झाली आहे. या हल्ल्यात ३३० नागरिक मृत्यूमुखी पडल्याचंही या संस्थेनं म्हटलं आहे.

<><><><><>

स्पेस एक्स स्टारशिप अंतराळयानाच्या स्फोटामुळे गुरुवारी सुमारे २४० उड्डाणं विस्कळीत झाल्याची माहिती अमेरिकेच्या फेडरल एव्हिएशन व्यवस्थापनानं दिली आहे. या स्फाटोनंतर अवकाशातील कचऱ्याच्या समस्येमुळे २४ हून अधिक विमानांचा मार्ग बदलावा लागला. यामुळे १७१ उड्डाणांना विलंब झाला, २८ विमानांचे मार्ग बदलले आणि ४० उड्डाणे सरासरी २२ मिनिटे थांबवण्यात आली. स्पेस एक्स चाचणी प्रक्षेपणाचा हा सलग दुसरा स्फोट होता.

<><><><><>

पूर्व आणि मध्य आफ्रिकेत सुमारे ८ कोटी २१ लाख लोकांना सध्या अन्न सुरक्षा भेडसावत असून त्यांना त्वरित मानवतावादी सहाय्याची आवश्यकता असल्याचं  संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि  कृषी संघटनेनं म्हटलं आहे. विकास आंतरशासकीय प्राधिकरण सदस्य राष्ट्रांच्या आठपैकी सात सदस्य राष्ट्रांमधल्या ५ कोटी ३१ लाख या समस्येनं बाधित असल्याचं  संघटनेनं म्हटलं आहे.

<><><><><>

तेहरान इथं सुरु असलेल्या आशियाई कबड्डी अजिंक्यपद स्पर्धा भारतीय महिला संघाने पाचव्यांदा जिंकली आहे. गतविजेत्या भारतानं अंतिम फेरीत इराणचा ३२-२५ असा पराभव केला. भारतीय महिला संघ या संपूर्ण स्पर्धेत अपराजित राहिला आहे.

<><><><><>

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू संघाचा सामना यूपी वॉरिअर्स संघाशी सुरू आहे. नाणेफेक जिंकून बेंगळुरूनं क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा युपी वॉरियर्सच्या ५ षटकात बिनबाद५७ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//